मी माणूस शोधतोय

कादंबरीचा प्रकाशन-समारंभ. दिवस जवळ येत चालला होता. घराला मंगलकार्याचं स्वरूप आलं होतं. याद्या चालल्या होत्या. वि. र. गोड्यांच्या नकलांचा कार्यक्रम ठरवायचा होता. आर्टिस्ट दिवाकरांनी निमंत्रण-पत्रिकांचं सुरेख ले-आऊट करून दिलं होतं. अल्पोपहार काय काय द्यावा ह्यावर चर्चा चालल्या होत्या. आमंत्रणातून कुणी चुकून राहिलं नाही ना, ह्याची छाननी चालली होती. अशाच कोणत्या तरी चर्चेत वसुंधरेनं विचारलं,
"कौतुक सप्तर्षींना आमंत्रण गेलं?"
"त्याचा पत्ता?"
"कुठूनही मिळवा. त्याला आमंत्रण मात्र जायलाच हवं."

मी चक्रावून गेलो होतो.
मला कौतुक सप्तर्षी सापडत नव्हता. एकोणिसशे साठ साली माझा पहिलावहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्याचं नाव होतं. 'लोंबकळणारी माणसं.' संग्रह प्रकाशित झाला तेव्हा कौतुक सप्तर्षींचं पहिलं अभिनंदनपर पत्र आलं. त्यानंतर प्रत्येक नव्या संग्रहाच्या वेळी न चुकता त्याचा शुभसंदेश यायचा. सुहासनं प्रथम नाटकात काम करून सरकारी पारितोषिक मिळवलं तेव्हा त्याचंही पत्र पाठवून त्यानं कौतुक केलं. स्वातीनं 'मला काही सांगायचंय' मध्ये काम केलं तेव्हा तिचंही अभिनंदन आणि एवढं सगळं करूनही त्या पठ्ठ्यानं एकाही पत्रावर स्वत:चा पत्ता दिलेला नव्हता.
त्याच्या पत्राचा आकार, रंग ठरलेला असायचा. वरच्या बाजूला 'कौतुक' हे नाव छापलेलं. मध्यभागी तो दोन किंवा तीन ओळींचा मजकूर, हस्ताक्षरात पण छापलेला वाटावा इतक्या रेखीवपणे लिहीत असे आणि खाली 'सप्तर्षी' अशी सही. कागदाच्या खाली डाव्या कोपऱ्यात एका खारीचं चित्र छापलेलं.
बस! इतकंच.
गेल्या बारा वर्षांत त्याची मला अठरा पुस्तकांची अठरा पत्रं, स्वाती-सुहासचं

VISIT…

पत्र आणि रंगभूमीवरील नेपथ्य हे वडिलांचं पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्यांना एक पत्र, अशी एकूण एकवीस पत्रं आली होती. सुरुवातीला पत्त्याअभावी, पोच देता येत नाही म्हणून रुखरुख, नंतर कुतूहल-आणि शेवटी शेवटी-त्याचा पत्ता माहीतच नाही, ह्याची सवय बनली.
कोकिळेला शोधायचा प्रयत्न आपण किती वेळ करतो!
पण ह्यावेळेला पत्र पाठवायला हवं. कादंबरी प्रकाशन-समारंभाला तो यायलाच हवा.

संध्याकाळी वि. र. गोडे नकलाकार यांच्या घरी गेलो. अतिशय मऊ, मुलायम आवाजात गोड्यांनी स्वागत केलं. कार्यक्रमाची सुपारी स्वीकारली. गंमत म्हणून त्यांनी कार्यक्रमाचे फोटो दाखवायला प्रारंभ केला. किती थोरामोठ्या कलावंतांनी गोड्यांचे कार्यक्रम पाहिले-घडवले आहेत त्याची कल्पना आली. एका फोटोत तर बडे बडे साहित्यिक, सुधीर फडके, वसंत देसाई, पु. ल. देशपांडे त्यांच्यामध्ये वि. र. गोडे. फोटोतले बहुतेक सगळे परिचयाचे होते. एका व्यक्तीवर बोट ठेवीत मी विचारलं,
"गोडेसाहेब, हा गृहस्थ कोण आहे?"
"हा कौतुक सप्तर्षी."
"काय सांगता काय?"
"हो, का?" -गोड्यांनी अगदी हळुवार आवाजात विचारलं.
"ह्या माणसाचा पत्ता द्या. मी त्याला खूप दिवस शोधतोय."
"पत्ता मलाही माहीत नाही."
"हा काय करतो माहीत आहे."
"एरवीचं माहीत नाही, पण माझा कार्यक्रम गाजला, पेपरला न्यूज आली की पत्र पाठवून कौतुक करतो."
"बरोब्बर!"
लोण्याच्या आवाजात गोड्यांनी विचारलं,
"तुम्हांलाही पत्रं येतात?"
"नियमितपणे येतात."

गोडे 'येतो' म्हणाले. मी सुटलो. सर्व परिचितांना आमंत्रणं करीत करीत मी फोटोग्राफर राजदत्तकडे गेलो. उत्साह, नियमितपणा, चोख काम आणि नम्रता ह्या सगळ्यांची बेरीज म्हणजे राजदत्त. स्टुडिओत पाऊल टाकताच तिथं अक्षरशः अशी

"Yes, Kaka, please come."
आजही तसंच स्वागत झालं. आज गुरुवार होता. खिडकीत सुरेख फुलं ठेवली होती. एका मोठ्या बशीत एक मोठा पेढा ठेवलेला होता. विजय निगेटिव्हज्वर नंबर टाकीत बसला होता. राजदत्त स्वत: हातात मॅग्निफाइंग ग्लास घेऊन एका कोणत्या तरी निगेटिव्हची ताकद अजमावत होते. टेबलावर तीन-चार अल्बम्स तयार होऊन पाठवणीची वाट पाहत होते. नाट्यसंपदाचा एक अल्बम तिथं होता. कोणत्या तरी नाटकाच्या त्रिशत-महोत्सवी सोहळ्याचे फोटो त्यात होते. ग्रुप फोटोत वसंत कानेटकर, पणशीकर, दारव्हेकर, शंकर घाणेकर...आणि गंमत म्हणजे त्या चौघांच्या पलीकडे तो कौतुक सप्तर्षी.
"राजदत्त, हा प्राणी कोण आहे?"
माझ्या प्रश्नाला मला उत्तर न देता राजदत्त म्हणाले,
"मिस दांडेकर, हा कोण आहे हे आपण काळेसाहेबांना सांगायचं का?"
"ते आपलेच आहेत. सांगून टाका."
राजदत्त म्हणाले,
"काळे, इथं किती माणसं भेटतात म्हणून सांगू? राजदत्तनं काम कसं करायचं? हा व्याप तुम्ही पाहताय. मी रात्रभर झोपलो नाही. बावीस रोल्स डेव्हलप व्हायचेत. बट आय ॲम डुईंग इट. सगळे येतात. भेटतात. पण माझ्याजवळ कंपार्टमेंटस आहे, मास्क आहे. आतपर्यंत पोहोचत नाहीत."
"मला माहीत आहे."
"तुम्ही ह्या माणसाला ओळखत नाही का?"
"नाही."
"तुम्हांला ह्याचं कधी ग्रीटिंग कार्ड आलं नाही का?"
"खूपदा आली आहेत. मला त्याचे आभार मानायचेत. पण बेटा, स्वत:चा पत्ता कळवत नाही."
"मी तुम्हांला त्याचा पत्ता देतो, पण मी पत्ता दिला हे त्याला कळता कामा नये."
"प्रॉमिस!"
दांडेकरने डायरी काढली.
"हा प्राणी एरवी काय करतो?"
माझ्या प्रश्नाला उत्तर न देता, निरनिराळ्या पाकिटांतून राजदत्तनं सात-आठ फोटो काढले. प्रत्येक फोटोत कौतुक सप्तर्षी कुठं ना कुठं होताच. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ह्यांचा शासनातर्फे गौरव झाला त्या समारंभात तो होता, कुमार गंधर्वांच्या बैठकीत होता, यशवंतराव चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या फोटोत तो होता, कोणत्या तरी

साहित्यसंमेलनात अनंत काणेकर आणि रणजित देसाई ह्यांच्यासोबत होता, तर एका फोटोत H. M. V. चं काही रेकॉर्डिंग चालू असताना तो मंगेश पाडगावकर आणि हृदयनाथ मंगेशकर ह्यांच्या मागंही होता.
"सगळे फोटो पाहिलेत?"
"हो."
"प्रत्येक ठिकाणी आहे ना?"
"तेच म्हणतोय मी. हा नक्की कोण आहे?"
"एक साधा पण अफाट माणूस आहे. तुम्ही त्याला भेटा आणि मग मला तुमचं मत सांगा."
कौतुक सप्तर्षींचा पत्ता मिळाल्यानं मी खुषीत होतो. बड्यांबड्यांबरोबर मी त्याला निरनिराळ्या फोटोत पाहिलं. त्याची आणि माझी अगोदर ओळख असती तर माझ्याकडच्या अल्बममध्ये तो असाच कोणत्या तरी ग्रुप फोटोत हमखास आला असता.
हरकत नाही.
कादंबरी प्रकाशन-समारंभाला तो नक्की येईल.

लालबागच्या त्या वस्तीत पाय ठेवण्याची आयुष्यातली माझी पहिलीच खेप होती. अशा वस्तीत माणसं कशी राहू शकतात अशी हळहळ व्यक्त करीत, बसमधून जाताना त्या इमारतीकडे मी आजवर निव्वळ पाहत आलो होतो. आज प्रत्यक्षात ते आयुष्य मी जवळून पाहत होतो. तीन मजली इमारत, मध्ये चौक, चौकात घुशींची बिळं आणि घुशींची बिनदिक्कत इकडून तिकडे पळापळ. गॅलरी गॅलरीतून ठोकलेल्या तारा. त्यावर कळकट परकर, विटलेली पातळं. त्याच गोंधळात टांगलेला क्वचित एखादा पोपटाचा पिंजरा. एरियलचे चौकोन, टांगलेल्या कुंड्या. त्यातून ओघळलेलं तांबडं पाणी. कठड्यावर टाकलेल्या चटया and what not? ह्याच धामधुमीत कोणत्या तरी ऑर्केस्ट्रावाल्याची पत्र्यावर रंगवलेली जाहिरात. एक कुठला तरी कबड्डी संघ, त्याशिवाय नाट्यसंस्था...सबकुछ होतं.
कौतुक सप्तर्षी चाळीत एकदम पॉप्युलर होता. तळमजल्यावर मी चौकशी करताच एकदम चार-पाच पोरं उत्साहानं खोली दाखवायला आली. हलणारा कठडा, घसरड्या पायऱ्या ह्यांच्याशी जमवून घेत मी तिसऱ्या मजल्यावर आलो. तो तीन मजल्यापर्यंतचा प्रवास एवढा जिवावरचा वाटला की त्यापेक्षा घोरपड लावून दोरीवरून चढणं सोपं वाटलं असतं. कौतुक सप्तर्षींच्या खोलीच्या

लागलो.
एका खोलीतला संसार.
पण संसार कशावरून? -खोलीत तर एकही पातळ नव्हतं, ब्लाऊज नव्हता, गृहिणीचा हात फिरलेला कुठंही दिसत नव्हता. असा हात ज्या घरात फिरतो त्याला निराळंच तेज चढतं. ते घर पोरकं वाटत नाही, कोरडं वाटत नाही. सप्तर्षींचं घर तसं वाटलं. ते घर नव्हतंच. ती खोली होती.
दरवाजासमोर लोखंडी कॉट. स्प्रिंगवाली. वर दोन गाद्या. साधी चादर.
कॉटखाली दोन ट्रंका. एक देवदारी लाकडी पट्ट्यांचं खोकं.
भिंतीवर जुनं, तासाला ठोके देणारं लंबकाचं अष्टकोनी घड्याळ.
कॉटजवळ एक टेबल आणि शेजारी पुरुषभर उंचीचं सेल्फ. त्या सेल्फात एखाद्या ऑफिसात ओळीनं लावतात त्याप्रमाणं जवळजवळ सत्तर-ऐंशी क्लिपवाल्या फाईल्स होत्या.
दरवाजाकडे पाठ करून सप्तर्षी काहीतरी लिहीत बसला होता.
मी दार वाजवलं.
त्यानं पाहिलं आणि तो उभा राहत म्हणाला,
"या, व. पु. या."
कॉटवर बसत मी विचारलं,
"तुम्ही मला ओळखता?"
"आपला एकत्र फोटोसुद्धा आहे."
"असं?"
"Yes."
"मला कसं माहीत नाही?"
"तुम्ही मोठे आहात."
असं म्हणत समोर एक अल्बम ठेवीत तो म्हणाला,
"तुम्ही हे फोटो पहा. तोपर्यंत मी पत्रं संपवतो. आठच्या आत ती पोस्टात पडायला हवीत. नाहीतर उद्या ज्यांचे वाढदिवस आहेत, त्यांना ती वेळेवर मिळायची नाहीत."
"अवश्य!"
सप्तर्षी पत्रं लिहायला बसला आणि मी मधूनमधून फोटोंकडे आणि त्याच्याकडे पाहत राहिलो. त्या अल्बममध्ये काय नव्हतं? कोण नव्हतं? साहित्य, नाट्य, कला, चित्रपट, संगीत, राजकारण...थोडक्यात म्हणजे गाजवण्यासारखी जेवढी क्षेत्रं असतात ती सगळी क्षेत्रं आणि प्रत्येक क्षेत्रात सध्या आघाडीवर असलेल्या सगळ्या व्यक्ती कौतुक सप्तर्षींच्या अल्बममध्ये हजेरी लावून उभ्या होत्या. कधी

जवळ, तर कधी अंतरावर. पण प्रत्येक फोटोत सप्तर्षी कुठं ना कुठं होताच. वसंतराव नाईकांपासून सगळे मंत्री, भीमसेन जोशींपासून सगळे गायक, नानासाहेब फाटकांपासून दत्ता भटांपर्यंत सगळे नट, वि. वा. शिरवाडकरांपासून पाडगावकरांपर्यंतचे कवी, सगळे नाटककार, लेखक दैनिका-मासिकांचे संपादक...किती यादी सांगावी? सगळी मोठमोठी माणसं एकत्र पाहून फार मजा वाटली. देश म्हटलं, महाराष्ट्र म्हटलं म्हणजे गहिवर दाटण्याइतका मी अस्वस्थ होत नाही. पण ही शंभर-दोनशेच्या घरात जाणारी मोठमोठी मंडळी एकत्र पाहून मला खरोखर, 'महाराष्ट्र' म्हणजे काय हे समजलं.
भारावलेल्या मन:स्थितीत मी अल्बम दूर ठेवला. सप्तर्षींचं माझ्याकडे लक्ष गेलं. तो म्हणाला,
"शेवटची दोन पत्रं. म्हणजे आजचा कोटा संपला."
"चालू द्या. मी थांबतो."
सप्तर्षींनं आणखीन एक अल्बम पुढे टाकला. तो तर आणखीनच अजब होता! वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणारे ते फोटो होते. स्कॉलरशिप मिळवून परदेशी निघालेल्या विद्यार्थ्यांपासून, पोहणं, खेळणं, निबंधस्पर्धा, वक्तृत्व, आंतरशालेय स्पर्धा इथंपासून आणि वय वर्षं सातपासून चाळीशी उलटल्यावर मॅट्रिकला बसून यश मिळवणाऱ्या व्यक्तींपर्यंत असंख्य फोटो तिथं होते.
"हे सर्व अफाट आहे हो!"
मी बोलून गेलो. लेखन थांबवता थांबवता तो म्हणाला,
"हेच काय ते खरं आहे."
"तुम्हांला हे एवढे फोटो मिळतात कसे पण?"
"रोज पेपरला येतात."
"असं?"
"रोज असतात. माझं लक्ष नेहमी तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या पानाकडं असतं. खून, मारामाऱ्या, अपघात आणि आज तेल गडप, उद्या तांदूळ गडप अशा बातम्या मी वाचत नाही. एक तर ह्या बातम्यांचं आयुष्य फार अल्प असतं आणि तरीही त्या तसल्या बातम्या आपलं मन उदास करतात."
"खरं आहे. मला लेखक असून हे कधी सुचलं नव्हतं."
कौतुक सप्तर्षी उत्साहानं म्हणाला,
"वर्तमानपत्र असं आपण म्हणतो खरं, पण खरं तर सगळी वर्तमानपत्रं भूतकाळ छापतात. तिसरं आणि चौथं पान मात्र भविष्यकाळ किती उज्ज्वल

त्या प्रश्नानं मी अस्वस्थ झालो. तो प्रश्न मलाही होता.
"जाऊ दे. तुम्हांला माझा पत्ता कसा मिळाला?"
"ज्यानं दिला त्यानं नाव सांगायचं नाही ह्या अटीवर पत्ता दिलाय. त्याच्याशी प्रामाणिक राहू की तुमच्याशी?"
मी त्याच्यावरच सोपवलं. पण कौतुक सप्तर्षी पटकन म्हणाला,
"तुम्ही त्याला दिलेला शब्द पाळा."
त्यानं पत्रं संपवली. गॅलरीत जाऊन कुणाला तरी हाक मारली. एक आठ-दहा वर्षांचा पोरगा धावत आला. सप्तर्षींची पत्रं टाकण्यासाठी घेऊन गेला. सप्तर्षी खोलीत येत म्हणाले,
"व. पु., आता बोला."
"कादंबरीच्या प्रकाशन-समारंभाचं आमंत्रण द्यायला आलो होतो."
"थँक्यू!"
"गेली दहा वर्षं तुमची ग्रीटिंग कार्डस् येत आहेत. तुम्ही तुमचा पत्ता न कळवल्यामुळं आमची फार कुचंबणा करून सोडलीत."
"का बरं?"
"आभार मानायला जागा ठेवली नाहीत."
"एवढंच ना?"
"वा, हा गुन्हा काही साधा नाही."
"प्रत्यक्ष भेटला आहात. आता शिक्षा सांगून टाका."
"पुढचं कार्ड पाठवाल तर त्यावर तुमचा पत्ता असायला हवा, हीच शिक्षा!"
"फार कडक शिक्षा सांगताहात, थोडी सूट द्या."
"का?"
"मी पत्ता जाणूनबुजून कळवत नाही."
"का पण?"
"अनाहूत पत्रं आलेली कुणालाही आवडतात, पण अशा पत्रांना उत्तरं पाठवणं हा एक मोठा व्याप होऊन बसतो. तो व्याप लेखक, नाटककार, गायक वगैरे मंडळींच्या मागं लावू नये असं मला वाटतं."
"सप्तर्षी, वाचकांना पत्रं लिहिण्यातही फार मोठा आनंद असतो."
"असेलही. मला मात्र पत्ता छापण्याची भीती वाटते."
"भीती?"
"भीती म्हणजे भीती नाही. पण काय होतं, पत्ता कळवला की आपण उत्तराची वाट पाहतो. उत्तराची अपेक्षा ठेवली की दुःख आलं. त्या व्यक्तीनं आभाराचं पत्र [illegible]

'कशाला आपण त्याला विश करायचं?' –असा विचार करायचा, इथं आपण येऊन थांबतो. हे टाळण्यासाठी म्हटलं, पत्ताच दिला नाही म्हणजे झालं!''
कौतुक सप्तर्षींचं बोलणं चुकीचं नव्हतं. तरी मी म्हणालो,
''तुम्हांला गाठण्यासाठी माझ्यासारख्याला जो त्रास झाला त्याचं काय?''
''माफी मागू?''
''नको. माझ्यासारखे आणखी काही असतील!''
''नक्की?''
''नक्कीच! त्यांच्यासाठी तुम्ही पत्ता द्यायला हवा. अपेक्षा न करता छापा. तो खरा निरपेक्ष योग. पत्ता न छापणं ही पळवाट झाली.''
''एकदम पटलं.''
सप्तर्षी समजूतदारपणे म्हणाला.
एवढ्यात त्याला कुणीतरी बोलवायला आलं.
''बसा, आत्ता येतो.''
सप्तर्षी गेला. मी टेबल आणि इतर फायलींचं निरीक्षण करू लागलो. पण तेवढ्यात तो परतलाच.
''सप्तर्षी, रोज किती पत्रं लिहावी लागतात?''
''कमीत कमी पाच. जास्तीत जास्तीचा आकडा सांगत नाही.''
''हा व्यवसाय किती वर्षं चाललाय!''
''गेली बावीस वर्षं.''
''काय सांगता काय?''
''खरं तेच सांगतोय.''
''आणखीन तीन वर्षांनी रौप्यमहोत्सवी वर्षं येणार?''
''हो, असं म्हणायला हरकत नाही.''
''तुम्हांला हे करून काय मिळतं?''
''आनंद!''
मी ह्या उत्तरावर नुसता पाहत राहिलो.
''काळे, दिवसातले जास्तीत जास्त तास इतरांचं चांगलं चिंतण्याच जातो, मग आनंद का व्हायचा नाही?''
''अगदी खरं आहे, पण मुळात आपण हे असं काही करावं-हे सुचलं कसं?''
सप्तर्षी गप्प बसला, जरा वेळानं तो म्हणाला,
''माझी मुलाखत घ्यायला आलात का?''

सप्तर्षी उठला. त्यानं पलंगाखालची ट्रंक ओढली. त्या ट्रंकेच्या तळाशी कार्डबोर्डची डबी होती. त्या डबीतून एक पिवळा पडलेला कागद काढून त्यानं माझ्या हातात दिला.
"ही आहे माझी प्रेरणा."
मी तो कागद वाचला. तात्याराव नावाच्या माणसाला लिहिलेलं ते पत्र होतं. पत्र लिहिणाऱ्या माणसावर त्या कुणा तात्यारावनं काय उपकार केला आहे, त्याला पत्ता लागत नव्हता. पण तो कोणी तात्याराव हा पृथ्वीवरचा देवदूत होता.
"तात्याराव कोण?" मी सप्तर्षीला विचारलं.
सप्तर्षी म्हणाला,
"मराठी रंगभूमीवरचे, हिंदी चित्रपटसृष्टीतले एकूण एक खलनायक ज्याला गुरू मानतील असा एक राक्षस. नाहीच पण, राक्षसही नाही. त्यालाही केव्हातरी पाझर फुटत असेल."
"काय सांगता काय?"
"स्वत:च्या बायकोला ह्या तात्यारावानं तिसऱ्या मजल्यावरून - ह्याच चाळीच्या चौकात ढकलून दिलं. चौदा वर्षं जन्मठेप भोगली, पुन्हा ह्याच चाळीत आला. चाळीतल्या लोकांनी त्याला थारा दिला नाही, धक्के मारून घालवून दिला. इथून जाण्यापूर्वी त्याला फक्त हे पत्र हवं होतं. कारण त्याला देवदूत मानणारी तेवढी एकच व्यक्ती जगात होती. चाळीतल्या लोकांनी त्याला जिनाही चढून दिला नाही. तो तसाच गेला. नंतर फार जगला नाही. त्याला लोकांनी धक्के मारून घालवला. ते दृश्य वाईट होतं आणि तरीही मी ते शांतपणे पाहत होतो. हा आपला बाप आहे ही भावनाच डोक्यातून गेली होती."
सप्तर्षी शांतपणे सांगत होता. मी एकाएकी म्हणालो,
"सप्तर्षी, काय सांगता काय?"
"माझ्या आईचा खून झाला तेव्हा मी दहा वर्षांचा होतो. तात्याराव तुरुंगात गेला तेव्हा अकरा वर्षांचा होतो. खटला एक वर्ष चालला होता. तात्याराव जाता-येता ह्या पत्राची मागणी कोर्टाकडे करायचा. दुष्टातल्या दुष्ट माणसालाही कुणीतरी आपल्याला सज्जन म्हणून ओळखावं ह्याचं किती अप्रूप वाटतं ह्याचा तो पुरावा होता. मी पोरका झालो, पण ह्याच चाळीतल्या माणसांनी मला वाढवलं, जगवलं. मॅट्रिकपर्यंत शिकलो तेही चाळीतल्यांनी निरपेक्ष आधार दिला म्हणून."
सप्तर्षी थांबला. मला खंड सहन झाला नाही. मी विचारलं,

"सांगतो... आमच्या शाळेचे प्रिन्सिपॉल फार कडक होते. शिस्तप्रिय होते. अकरा वाजता ते स्वत: छडी घेऊन उभे असायचे. उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना सपासप मारायचे. एकदा सहज सणक आली आणि त्यांच्या वाढदिवसाला मी एक कार्ड आणि फुलं पाठवली. त्यानंतर आठ-दहा दिवसांनी मला असाच शाळेत जायला उशीर झाला. वार लावून जेवत होतो, केव्हा केव्हा लोकांकडे उशीर व्हायचा. पण गंमत म्हणजे, इतर दोन-चार मुलांना छड्या बसल्या पण प्रिन्सिपॉलनी मला तसंच सोडून दिलं. तात्यारावलासुद्धा त्या एकुलत्या एका पत्राचं किती कौतुक वाटायचं ह्याचा अनुभव होताच. त्यातून प्रेरणा मिळाली. मग हेतुपुरस्सर सगळ्या मास्तरांच्या वाढदिवसांना, दिवाळीला, संक्रातीला शुभेच्छा पाठवल्या. सगळ्या शिक्षकांनी मला अभ्यासात खूप मदत केली. मॅट्रिकचं यश पदरात पडलं. वर्षभरानं नोकरी मिळाली."

"नोकरी कशी मिळाली?"

"ग्रीटिंग कार्ड्सच्या जोरावर!"

"म्हणजे कशी पण?"

"मॅट्रिकचा निकाल लागला आणि मी संशोधनाला प्रारंभ केला. बाप खुनी, हे सांगायची सोय नव्हती. नातेवाइकांनीसुद्धा जिथं पाठी फिरवल्या, तिथं इतरांचं काय? रोज मैलनमैल चालत होतो. सगळ्या इंग्लिश-अमेरिकन कंपन्यांवर डोळा ठेवला होता. फोर्बस् कॅम्पबेल, ग्लॅक्सो, फायझर, रिचर्डसन क्रूडास, हेक्स्ट, डाइंग, टाटा, टेल्को, सगळीकडे जायचं. वेष हा असा गबाळा, चेहरा बावळा. कोण दारात उभं करणार आम्हांला? - रिसेप्शनिस्ट हाकलूनच द्यायची- 'काय काम आहे?'-विचारलं की सांगायचं, 'तुमच्या बॉसची बर्थडेट हवी होती, त्यांना ग्रीटिंग कार्ड पाठवायचं आहे!' - हे कारण इतकं निरुपद्रवी वाटायचं की रिसेप्शनिस्ट स्वत: तारीख आणून द्यायची. त्या सर्वांना मी वर्षभर निमित्त काढून भेटकार्ड पाठवित राहिलो. कार्ड घरीच तयार करीत होतो. हस्ताक्षर उत्कृष्ट होतं. त्याचाही परिणाम व्हायचा. नोकरी मिळेपर्यंत चाळीतल्या मंडळींचं अंगावर पडेल ते काम करीत होतो व अजून करतो. त्यानंतर ग्लॅक्सो कंपनीकडून अचानक भलं मोठं पाकीट आलं. कंपनीनं इक्विटी शेअर्स विकायला काढले होते आणि मला एक छापील फॉर्म पाठवला होता. ग्रीटिंग कार्ड पाठवणारा म्हणजे मी बडा माणूस असणार हा त्यांचा गैरसमज. साहेबांच्या पी.ए.ला भेटलो. इक्विटी शेअरचा फॉर्म परत केला आणि अजून नोकरीचा पत्ता नाही हे सांगितलं आणि काळेंसाहेब, you may not perhaps

गायक...सगळ्यांचं भलं व्हावं हे व्यक्त करण्यासाठी लेखणी राबवतो!''
थक्क होऊन मी सप्तर्षींची कहाणी ऐकत होतो. त्याचं नाव कौतुक हेही मला नावीन्यपूर्ण वाटलं होतं. त्याचाही त्यानं खुलासा केला. तो म्हणाला,
''माझं खरं नाव विश्वनाथ. मी जेव्हा हे ग्रीटिंग कार्ड्सचं काम सुरू केलं तेव्हा वाटलं की एकट्याला झेपेल असं हे कार्य नाही. मग मी 'कौतुक' ह्या नावाची संस्था स्थापन केली. दुर्गेस नावाच्या एका भल्या अंत:करणाच्या माणसाची मला अजोड साथ मिळाली. संस्थेसाठी आम्ही खार ह्या प्राण्याचं प्रतीक निवडलं. लेटरहेड्स छापून घेतली. आमच्यासारख्याच छोट्या माणसांकडून होणारं मोठ्या कलावंताचं कौतुक म्हणजे सेतू बांधण्याच्या कामात खारीची मदत-ह्या अर्थानं आम्ही खारीचं चित्र सिम्बॉल म्हणून निवडलं. संस्थेतर्फे पहिला सत्कार प्रभाकर पेंढारकरांचा केला. महाराष्ट्रावरच्या डॉक्युमेंटरीचे ते दिग्दर्शक होते आणि त्यांना दिल्ली सरकारकडून पुरस्कार मिळाला होता. दुसरा सत्कार विजय तेंडुलकरांचा व्हायचा होता. पण प्रत्येकाला कामं होती. त्यात माझा जिवाभावाचा मित्र दुर्गेश अपघातात वारला. त्याच्या सोन्यासारख्या संसाराला दृष्ट लागली. आमची संस्था संपुष्टात आली. मी यथाशक्ती ते काम चालू ठेवलं.''
''खूप मोठं कार्य करताहात!''
''मराठी रंगभूमीवर दिनकर ढेरे नावाचा असामान्य नट होऊन गेला. तो कामण्णाची भूमिका अशी अप्रतिम करायचा की शेवटी त्याचं नाव दिनकर कामण्णा असंच पडलं. तसं आता संस्थेचं नाव मला पडलं आहे.''
''भूमिकेचं किंवा संस्थेचं नाव व्यक्तीला मिळणं ह्याहून मोठा सत्कार, त्या व्यक्तीचा, कुणाला करता येईल का?''
''खरंच विचाराल तर मला सत्काराची अपेक्षा नाही. तुम्ही स्वत: लेखक आहात, मुलाखत टाइप प्रश्न विचारायला मला आवडत नाही. तरी विचारतो, लेखनामागचा तुमचा हेतू सांगू शकाल का?''
मी लगेच सांगितलं,
''मी माणूस शोधतोय.''
''आजवर भेटला की नाही?''
''अनेकदा भेटला. नाना स्वरूपात भेटला. कधी खऱ्या स्वरूपात, कधी खोट्या, तर कधी संपूर्ण स्वरूपात, पुष्कळदा तो निसटलाही. ह्या माणसानं मला कधी रडवलं, कधी हसवलं, कधी भुलवलं, कधी हरवलं, कधी फुलवलं, कधी थकवलं, कधी बेचैन केलं, कधी अंतर्मुख...''

"चालूच आहे आणि चालूच राहणार, माझा पेशन्स दांडगा आहे. ह्याचं श्रेयही पुन्हा माणसांनाच आहे. वाट पाहत राहण्याची माझी ताकद माणसांनीच वाढवली आहे आणि सप्तर्षी, आता अलीकडे काय वाटतं सांगू का?"
"अवश्य!"
"क्रियापदांना अर्थच नसतो. मागचा माणूसच काय तो अर्थपूर्ण. क्रियापदाची भीती संपली की माणूस हवाहवासा वाटतो."
"काळे, प्रत्येक शोधाचा काही निष्कर्ष असतो. सिद्धांत असतो, तुमचा सिद्धांत..."
"शोध पूर्ण झालेला नाही, पण निष्कर्ष सापडला आहे."
"सांगाल?"
"जरूर. जगात चांगल्या माणसांची संख्या जास्त आहे."

माझ्या कादंबरीचा प्रकाशन-समारंभ थाटानं पार पडला. कौतुक सप्तर्षी कार्यक्रमाला आला. वि. र. गोडे आणि मी, आमच्यामध्ये उभं राहून कौतुक सप्तर्षीनं फोटो पण काढला. त्या फोटोची प्रत मी मुद्दाम त्याला पाठवली. त्याच्या निरपेक्ष कार्याचं पुन्हा कौतुक केलं. त्याच्यासाठी मी काय करावं हेही मी त्याला पत्रातून विचारलं. मला पाठवलेल्या चार ओळींच्या उत्तरात त्यानं लिहिलं, "माझी कुणाकडूनही कशाचीही अपेक्षा नाही. इच्छाच विचारणार असाल तर सांगेन, की माझं जर काही कमीजास्त झालं आणि त्या दिवशी तुम्हांला सवड असेल, तर माझ्या शेवटच्या यात्रेत दहा पावलं माझ्यासाठी चाला."
पत्र वाचून माझं मन भरून आलं. पत्राखाली सप्तर्षीनं आपला संपूर्ण पत्ता दिलेला होता.

त्यानंतरच्या माझ्या वर्षवाढदिवसाला त्याचं पत्र आलं. मी त्याला मागच्या वर्षीपासून पत्राखाली पत्ता लिहिण्याची सक्ती केल्यामुळे चांगलं झाल्याचं त्यानं कळवलं होतं. सुमारे दीडशे-दोनशे माणसांनी कौतुक सप्तर्षीचं त्याच्या ह्या उपक्रमाबद्दल कौतुक केलं होतं. आभार मानले होते. त्या सर्वांचं क्रेडिट त्यानं माझ्या पदरात टाकलं होतं.
आता वर्तमानपत्रांतून झळकणाऱ्या मोठमोठ्या समारंभांच्या फोटोत, बड्याबड्यांच्या सहवासात सप्तर्षीचं दर्शन घडू लागलं. स्वत:चा फोटो यावा हा त्याला छंद होता. त्यासाठी मैत्री, नाट्यसंस्था ह्यांच्या छायाचित्रकारांशी सप्तर्षीनं मैत्री जोडली होती. ते ते छायाचित्रकार नेमकी वेळ साधून सप्तर्षी फोटोत येईल अशी व्यवस्था करीत.

आणि एके दिवशी वर्तमानपत्रात ती धक्का देणारी बातमी जाड टाइपात प्रसिद्ध झाली. कौतुक सप्तर्षीला अपघात झाला होता. डबल डेकर बसनं उडवलं होतं. प्रत्येकजण स्वत:च्या तंत्रानं वर्षानुवर्षं रस्ता क्रॉस करतो. अपघात होईतो हे तंत्र चुकीचं होतं असं कुणी मान्य करीत नाही.

मी सप्तर्षीला भेटायला गेलो. सप्तर्षी बेशुद्धावस्थेत होता. त्याला भेटायला येणाऱ्यांची वॉर्डमध्ये रांग लागली होती.

दुसऱ्या दिवशी 'मराठा'त कौतुक सप्तर्षीला किती मंडळी भेटायला येऊन गेली त्या सर्वांची कॉलमभर नावं प्रकाशित करण्यात आली.

चार ते पाच दिवस तो बेशुद्धावस्थेत होता.

सहाव्या दिवसापासून त्याच्या प्रकृतीला आराम पडू लागला. आठव्या-दिवशी त्याला हुशारी वाटायला लागली. मी पुन्हा भेटायला गेलो तेव्हा तो गप्पा मारायच्या मूडमध्ये होता.

"तुम्ही लोकांनी मला वाचवलंत."

"आम्ही म्हणजे कुणी?"

"गेल्या आठ दिवसांत माझ्यासाठी किती मोठ्या लोकांना हॉस्पिटलमध्ये यावं लागलं त्याची यादी मी वाचली. वाईट वाटलं."

"त्यात काय मोठंसं? तुम्ही गेली अनेक वर्षं ह्या सर्वांवर प्रेम केलंत. त्यांनी ते ह्या रितीनं व्यक्त केलं."

"काळे, मी सर्वांवर प्रेम केलं ह्यात नवं किंवा खास असं काय केलं? तुम्हा सर्वांची योग्यता फार मोठी आहे. कलावंत समाजाची जेवढी सेवा करतो, रंजन करतो. समाजाला कुणी हसवतो, फुलवतो, तेवढं पुण्य आणखी कुणी करू शकणार नाही. अगदी ह्या क्षणी अनेक लेखकांची पुस्तकं हजारो वाचकांच्या हातात असतील. पाडगावकर, शांताबाई शेळके, माडगूळकर ह्यांची गीतं घरोघरी ह्या क्षणी गायली, ऐकली जात असतील. लता, आशा, रफी, मुकेश ह्यांच्या रेकॉर्ड्स अख्ख्या भारतात आत्ता वाजत असतील. नाट्यगृहांतून नामवंत नटसंचाचा आविष्कार हजारो प्रेक्षक एकाच वेळी अनुभवत असतील. ही सर्व पुण्यवान मंडळी कुठं-मी कुठं? ह्या थोर कलावंतांना मी सातत्यानं शुभेच्छा देत आलो. गेली बावीस वर्षं. जनसेवा, मनोरंजन हा त्यांचा पुरा न होणारा सेतू आणि मी खारीएवढा..."

सप्तर्षी दमला. मी त्याला पुढे बोलूच दिलं नाही. जरा वेळ विश्रांती घेऊन तो पुन्हा बोलणार तेवढ्यात मी त्याला थांबवलं,

"तुम्ही स्वस्थ पडा."

"आज्ञा बोलत येऊ दे. सगळं बोलत राहिलं की पुन्हा सुरू व्हायचं नाही.

वेळात वेळ काढून दुसऱ्यांदा आलात. बरं वाटलं. माझ्यासाठी कुणीही येणार नाही अशी मला भीती वाटत होती. आता ती उरली नाही. माझा तात्याराव व्हायचा नाही.''
''म्हणजे काय?''
''तात्याराव नंतर जास्त जगला नाही. तो केव्हातरी रस्त्यातच गेला. त्याचं प्रेत तीन दिवस प्रेतागारात पडून होतं आणि शेवटी बेवारशी म्हणून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. मी तात्यारावांचा मुलगा. अंगात कोणतीही कला नाही. किडेमुंग्या जगतात-मरतात तसा मी. ह्या अवाढव्य पसाऱ्यात माझी आल्या-गेल्याची निशाणीसुद्धा राहायची नाही, अशी सारखी भीती मनात होती. जनमनावर राज्य करू शकणाऱ्यांचं कौतुक वाटायला लागलं. मग त्यांच्या चिंतनात, लेखनात स्वत:ला गुंतवून घ्यायला लागलो. एखाद्या कलावंतानं दोन दोन तपं साधना करावी, तसं मी बावीस वर्षं...''
''सप्तर्षी, तुम्ही आता पडून रहा. कसलाही विचार करू नका. तुम्ही अगोदर बरे व्हा.''
''होईन किंवा होणारही नाही. मला आता मरणाची भीती वाटत नाही. मी मेलो तरी जगणार आहे. घराघरांतून स्वत:चे, समारंभांचे फोटो जो तो मरेपर्यंत जपणारच आहे. तितकी वर्षं मीही घराघरातून जगणारच आहे. मी तसा मरणार नाही... तसा मरणार.. '' बोलता बोलता त्याला वात झाला. तो हातवारे करू लागला.
डॉक्टर आले. त्यांनी कसलंसं इंजेक्शन दिलं.

त्यानंतरच्या तिसऱ्या की चौथ्या दिवशी सप्तर्षी वारला. त्याचं नशीब असं बलवत्तर की, 'वाऱ्यावरची वरात'च्या प्रयोगासाठी पु. ल. मुंबईत होते. माडगूळकर, सुधीर फडके, विनायकराव सरस्वतेंच्या घरी भेटले. नाट्यमंदार, चंद्रलेखा सगळ्या संस्था मुंबईतच होत्या.
कौतुक सप्तर्षीची यात्रा त्याच्या अपेक्षेप्रमाणे प्रचंड निघाली. मंत्र्यांनी दुखवट्याचे संदेश पाठवले. यात्रेचे फोटो घेतले जात होते. कौतुक सप्तर्षीचीच ती यात्रा असल्यानं, त्या घेतल्या जाणाऱ्या फोटोतही तो स्वत: होताच.
एका खारीची ती प्रचंड यात्रा पाहून मी दिपलो होतो आणि मुग्ध होऊन त्या यात्रेबरोबर चालत होतो. एक माणूस सापडता सापडता हातून निसटला होता.

❖❖